कि.फौ.अर्ज :- १३२/२०१७
रिता/रमेश
नि.क्रं. २४

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्रं. २ चा साक्षीपुरावा-**
**शपथेवर सांगतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | - | कौशलबाई बापुरावजी खंगार |
| वय | - | ५० वर्षे. |
| व्यवसाय | - | मजुरी |
| राहणार | - | महादुला त. पारशिवनी जि. नागपुर |

**सरतपास अर्जदारातर्फे श्री. पी.टी. गजवे वकील साहेब-**

१. अर्जदार रिता ही माझी मुलगी आहे. गैरअर्जदार क्रं. १ रमेश हा माझा जावई आहे. गैरअर्जदार क्रं. २ ते ७ हे गैरअर्जदार क्रं. १ चे नातेवाईक आहेत. माझी मुलगी लग्नानंतर गैरअर्जदार क्रं. १ कडे नांदावयास गेली. गैरअर्जदार क्रं. १ हा माझी मुलगी रिता ला दारू पिउन येउन मारहान करायचा व घरामध्ये अन्न धान्य आणत नसे. गैरअर्जदार क्रं. १ यांनी अर्जदार हिस बाळंतपणासाठी माझया घरी आणुन सोडले होते. गैरअर्जदार क्रं. १ याने रिताच्या बाळंतपणाचा खर्च केला नाही. अर्जदार हिच्या बाळंतपणाचा मी स्वत: केला. गैरअर्जदार क्रं. १ याने अर्जदार हिच्या पालनपोषनचा खर्च दिला नाही. अर्जदार ही माझयाकडे १ वर्षे राहली. या काळामध्ये गैरअर्जदार क्रं. १ अर्जदार हिला घेउन जाण्यास आला नाही. या एक वर्षाच्या काळात गैरअर्जदार याने अर्जदाराला खावटी दिली नाही.

२. गैरअर्जदार क्रं. १ ने अर्जदाराला घेउन येण्याकरीता नातेवाईकाला पाठविले होते. त्या नातेवाईकासोबत मी अर्जदार हिला गैरअर्जदार क्रं. १ च्या घ ारी पाठविले होते कारण गैरअर्जदार क्रं. १ च्या वागणुकीमध्ये सुधारणा होईल. गैरअर्जदार क्रं. १ ने परत अर्जदार हिला त्रास देण्यास सुरूवात केली. दिनांक ११.०५.२०१६ रोजी मी माझया मावस भावाच्या लग्नाला दिघोरी येथे गेली होती.

DISTRICT COURT NAGPUR

त्या लग्नामध्ये मी, माझे पती व गैरअर्जदार क्रं. १ गेलो होतो. त्या लग्नामध्ये गैरअर्जदार क्रं. १ हा अर्जदाराला त्याच्या घरी घेउन जाण्यासाठी सांगत होता. अर्जदार ही त्याच्या सोबत गेली नाही म्हणुन गैरअर्जदार क्रं. १ ने अर्जदार हिचे बाळ हिसकावुन घेतले. त्यावेळी बाळाचे वय १ वर्षे होते. गैरअर्जदार क्रं. १ ने त्या बाळाला नागपुर ते नागभीड जाणा-या रेल्वेच्या रूळावर टाकले होते. त्या बाळाला माझा मावस भाउ लल्लाजी मानकर याने घेउन आला. त्यावेळी गैरअर्जदार क्रं. १ लल्लाजी मानकरला मारावयास धावला. त्यावेळी गैरअर्जदार क्रं. १ ने बाळाला घेण्यास मज्जाव केला. अर्जदार ही गैरअर्जदार क्रं. १ सोबत त्याच्या घरी गेली. अर्जदाराला गैरअर्जदार क्रं. १ ने हकलुन दिले.

३. अर्जदार हिला तिचे सासु-सासरे, भासरा, चुलत सासरा ईसरू ने त्रास दिला. अर्जदार हिला गैरअर्जदाराने घरातुन हकलुन दिले ही बाब मला चार दिवसांनी समजली. या बाबत मला आखाडाजी मेश्राम यांच्याकडुन समजले. मी दुस-या दिवशी गैरअर्जदार क्रं. १ च्या घरी गेली होती. त्या ठिकाणी मी अर्जदार हिची चौकशी केली. गैरअर्जदार क्रं. १ ने सांगीतले की, अर्जदार कुठे गेली हे त्याला माहीती नाही तसेच गैरअर्जदार क्रं. १ म्हणाला की, अर्जदार हिला तो पाहत बसला काय. त्यानंतर मी पोलिस ठाणे नंदनवन नागपुर या ठिकाणी तक्रार दाखल केली. आता मला तक्रार दाखविली. ती तक्रार तीच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. ती तक्रार आर्टीकल अ-१ वर आहे.

## <u>उलटतपास गैरअर्जदार क्रं. १,२,४ ते ७ साठी श्री. एस. के. मानकर वकील साहेब.</u>

४. मी अंगठा करते. मला लिहीता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार ही गैरअर्जदार क्रं. १ सोबत नांदावयास तयार नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार हिने गैरअर्जदार क्रं. १ च्या विरूद्व घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्रं.

१ तिला घटस्फोट दयायला तयार नाही. हे म्हणणे खरे आहे की, म्हणुन अर्जदार हिने लग्नातील आंदन सामान मिळण्याकरीता हा सदरचा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराने सदरचा अर्ज तिला घटस्फोट मिळावा या उददेशाने दाखल केला आहे.

५. अर्जदार हिचा मुलगा प्रियांशु याचा जन्म मेडीकल रूग्णालय नागपुर येथे दिनांक १९.०२.२०१४ रोजी झाला. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार ही बाळाला घेउन सहा महीने तरोडी या गावी राहीली. हे म्हणणे खरे नाही की, मी एके दिवशी तरोडी या गावी गेली आणि गैरअर्जदार क्रं. १ ला न विचारता अर्जदार हिला माझया घरी घेउन आली. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आखाडुजी मेश्राम हे अर्जदार हिला घ्यावयास माझया घरी आले.

६. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७.०५.२०१६ रोजी अर्जदार ही कुणालाही न सांगता बाळाला एकटे सोडुन निघुन गेली. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही घर सोडुन गेल्यानंतर गैरअर्जदार क्रं. १ व त्याच्या नातेवाईकांनी तिची खुप शोधाशोध केली. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिचा खुप शोध घेतला असता ती मिळुन न आल्यामुळे गैरअर्जदार क्रं. १ ने नंदनवन पोलिस ठाणे येथे दिनांक १८.०५.२०१६ रोजी अर्जदार ही बेपत्ता आहे असा अर्ज दिला. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही घर सोडुन गेली होती व ती कुठे होती या बाबत मला माहीती होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर दहा ते बारा लोक घेउन मी तरोडी येथे गैरअर्जदार क्रं. १ च्या घरी गेली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी गैरअर्जदार क्रं. १ व त्याच्या नातेवाईकांना मी खोटी केस दाखल करण्याची धमकी दिली होती.

७. हे म्हणणे खरे आहे की, प्रियांशु हा दिनांक २३.१२.२०१७ रोजी गैरअर्जदार क्रं. १ कडे मयत झाला. अर्जदार हिला औषधोपचारासाठी मी खर्च

केला या बाबतचा दस्त मी जोडला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदार हिला कोणत्याही प्रकारचा औषधोपचारासाठी खर्च केला नाही. गैरअर्जदार क्रं. १ ने बाळाला रूळावर ठेवले होते या बाबत तक्रार दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडली नव्हती म्हणुन मी तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, जे मी सरतपासात बाबी सांगीतल्या आहेत त्या पहील्यांदाच आज रोजी न्यायालयात सांगत आहे आणि यापुर्वी त्या बाबी कुणालाही सांगीतल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिला घटस्फोट मिळण्याकरीता मी अर्जदार हिच्या सांगण्यावरून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-
( सं. दि. वानखेडे)
न्यायदंडाधीकारी प्र. वर्ग,
पारशिवनी.

समक्ष

स्वा/-
( सं. दि. वानखेडे)
न्यायदंडाधीकारी प्र. वर्ग,
पारशिवनी.

दिंनाक :-२९/११/२०१८.

DISTRICT COURT NAGPUR